स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि.-५/२०२५/ 1104 दिनांक 28 MAR 2025

# कालबाह्य झालेली यंत्रसामुग्री,उपकरणे इ.साहित्य विक्रीची सुचना

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे, ४१२ ई, ३ रा मजला, म.रा.तं.शि.नवीन इमारत,बहिरट पाटील चौक,शिवाजीनगर, पुणे येथील निरूपयोगी,कालबाह्य झालेली यंत्रसामग्री,उपकरणे,टुल्स साहित्याची विक्री करावयाची आहे. सदर विक्रीकरीता ईच्छुक संस्थांनी दिनांक २८/३/२०२५ ते ७/४/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त मोहोरबंद लिफाफ्यातून दरपत्रके या कायालयांत सादर करावे. जास्तीत जास्त दर देणा-या संस्थेचे दर मान्य करण्यांत येतील. वर नमूद साहित्य उपरोक्त पत्त्यावर उपलब्ध असून ते दिनांक २८/३/२०२५ ते ७/४/२०२५ दरम्यान सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० यावेळेत पाहता येतील.

दि. ८/४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता समीती सभागृह, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे, या ठिकाणी प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्यांत येतील.

ज्या संस्थांना खालील नमूद अटी व शर्ती मान्य असतील अशा संस्थांनीच आपली दरपत्रके सादर करावीत व लिफाफ्यावर कालबाह्य झालेली यंत्रसामुग्री,उपकरणे इ.साहित्य विक्री करिता दरपत्रक असे नमूद करावे.

अटी व शर्ती

१. सदर यंत्रसामुग्री,उपकरणे इ.साहित्य तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे, ४१२ ई, ३ रा मजला, म.रा.तं.शि.नवीन इमारत,बहिरट पाटील चौक,शिवाजीनगर, पुणे येथे असून आहे त्या स्थितीतून उचलण्यांस तयार आहे.
२. ठेकेदाराने यापूर्वी मागील ६ महिन्यात शासकीय कार्यालयातील यंत्रसामुग्री,उपकरणे इ.साहित्य खरेदी केल्याचे आदेशाची प्रत जोडावी.
३. जास्तीत जास्त दर देणा-या संस्थेचे दरपत्रक मान्य करण्यांत येईल व त्या संस्थेस तंत्रशिक्षण विभागातील कार्यालयाकडे रू. १०,०००/ इतकी आगाऊ रक्कम २ दिवसात भरावी लागेल. सदर रक्कम साहित्य विक्री रकमेमध्ये समायोजित करण्यांत येईल.
४. यंत्रसामुग्री,उपकरणे इ.साहित्य कामाचे आदेश दिल्यापासून कार्यालयीन ७ दिवसांच्या आत साहित्याचे वजन करून साहित्य आहे त्या स्थितीतून उचलावे लागेल.
५. साहित्याचे वजन तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या समक्ष करणे अनिवार्य आहे. तसेच त्या वजन काट्याचे निरीक्षण या कार्यालयाकडून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कोणतेही दरपत्रक मंजूर करणे वा रद्द करणे तसेच साहित्य विक्रीची कोणतीही कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे या कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील त्या बद्दल कोणतीही कारणमिमांसा केली जाणार नाही.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत–१. नोटीस बोर्ड
२. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी